CCPS
An AIChE Technology Alliance
Center for Chemical Process Safety

# Process Safety Beacon

http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx

उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

**CCPS च्या समर्थकांकडून प्रायोजित**

## एका दुर्घटनेतून वेळीच घेतलेला धडा

ऑगस्ट २०१०


खोल समुद्रातील हॉरिझॉनवरील आग


२० मे, २०१० झालेली तेलगळती



तेलखाणीच्या मुखातून वाहणारे तेल

एप्रिल २०, २०१० लुइझियाना किनारपट्टीजवळ मक्सिकोच्या आखातात डीपवॉटर हॉरिझॉन नामक तेलखाणीवर झालेल्या स्फोटात ११ जण मृत्यूमुखी पडले तर अन्य १७ जण जखमी झाले. जवळपास ३६ तासांनंतर ती तेलखाण बुडली. पर्यायाने वाताहात झालेल्या तेलखाणीतून झालेली तेलगळती ही अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात मोठी तेलगळती होती. ही दुर्घटना म्हणजे साऱ्या जगभर चर्चिली जाणारी एक मोठी बातमी होती. हे बीकॉन लिहीले जात असतानादेखील तेलखाणीतून तेलगळती चालूच आहे. या दुर्घटनेचे निश्चित कारण समजण्यास काही काळ लागेल आणि पुढील काही महीन्यात अनेक प्रकारे चौकशी केली जाईल. तथापि आपल्या संयंत्रात काय बिघाड होईल व आणीबाणीच्या प्रसंगाला सामोरे जाण्यास अधिक चांगल्या प्रकारे सिद्ध होऊ शकतो याच्या जाणीवेचे महत्व समजून घेण्याची ही वेळ आली आहे. आपत्कालीन पद्धती आणि उपकरणे नेहमी वापरली जात नाहीत – अखेर आपत्कालीन घटना दुर्मिळ असतात! परन्तू त्या उद्भवू शकतात, आणि म्हणून आपण आपण याची खात्री केली पाहीजे की अपघाताच्या शक्यतेची धोक्याची चिन्हे कशी ओळखावीत हे आपण जाणतो, आपत्कालीन उपकरणे व्यवस्थित काम करीत आहेत याची खात्री कशी करावी हे आपण जाणतो, आणि वरचेवर आपल्या आणीबाणी नियंत्रण पद्धतीचा सराव केला जातो.

## आपण काय करु शकता ?

- आपल्या संयंत्रातील मोठा बिघाड होऊ शकणाऱ्या गोष्टी शोधा आणि समजून घ्या.
- संभाव्य मोटया दुर्घटनाचे मिळणारे संकेत ओळखण्यास शिका.
- संभाव्य मोटया दुर्घटनाचे असे संकेत आढळून आल्यास त्या रोखण्यातील आपली भूमिका आपणास ज्ञात असल्याची खात्री करा.
- आपल्या संयंत्रातील मोटया दुर्घटना रोखण्यासाठी बनविण्यात आलेल्या उपकरणांची निगा कशी ठेवावी याची माहिती करून घ्या.
- आपल्या संयंत्रातील मोटया दुर्घटना रोखण्यासाठी तयार करण्यात आलेल्या महत्वाच्या पद्धती स्वतःला परीचित करून घ्या.
- मोठी दुर्घटना घडल्यावर स्वतःचा आणि इतरांचा बचाव करण्यासाठी तसेच नुकसान कमी करण्यासाठी काय करावे ते समजून घ्या.
- आपल्या संयंत्रातील आणीबाणी नियंत्रण पद्धतीचा वरचेवर सराव केला जातो याची खात्री करा ज्यामुळे प्रत्यक्ष दुर्घटना घडल्यास काय करावे याबाबत आपण परीचित व्हाल.

**आपल्या संयंत्रामध्ये आपत्तीशी कसा सामना करावा हे आपणास ज्ञात आहे का?**

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणी पुनर्विक्री करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org or २१२.५९१.७३१९

हे बीकॉन सहसा अफ्रीकन, अरेबिक, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, हंगेरियन, इंडोनेशियन, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तमिळ, थाई, तेलगू, तुर्की, उर्दू आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.